# <u>प्रकरण – दोन</u>

# नियमावली : 1

## <u>संस्थेची वैशिष्ट्ये, कार्य आणि कर्तव्ये :</u>

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या कलम 63(ड) अन्वये सार्वजनिक उपवने , उदयाने अथवा मनोरंजन मैदाने (जलतरण तलाव) उभारणे अथवा ती सुस्थितीत ठेवणे हे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे स्वेच्छाधिन कर्तव्य आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तरण तलावात सर्वसाधारण जनतेस पोहण्यास शिकण्यासाठी संधी उपलब्ध करुन मनोरंजन सुविधा देणे हे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कार्य आहे.

## <u>जनरल अरुणकुमार वैद्य तरणतलाव, चेंबूर :</u>

जनरल अरुणकुमार वैद्य महानगरपालिका जलतरण तलावाचे पुनर्विकासाचे कामकाज पूर्ण झाले असून सदर तलाव दि. 11.09.2018 पासून सभसदांसाठी सुरु करण्यात आला आहे. सदर जलतरणतलाव “एल” आकाराचा असून तो ऑलिंपिक आकाराचा (25 मीटर X 50 मीटर) आहे. येथे 8 मीटर X 16 मीटर आकाराचा किड्स पूलही बांधण्यात आलेला आहे . सदर तरणतलाव चेंबूर येथे महानगरपालिकेच्या एम /पश्चिम विभागाजवळ आहे.

# <u>आकृतीबंध रचना</u>

महानगरपालिका आयुक्त

अतिरिक्त म.न.पा. आयुक्त (पू/उप)

महानगरपालिका उप-आयुक्त (आ.व्य.)

व्यवस्थापक

सहाय्यक व्यवस्थापक

तांत्रिकी कर्मचारी व श्रमिक कर्मचारी

लिपिक

तरणतलावाद्वारे पुरविण्यात येणा-या सेवा आणि जनतेच्या तक्रारींवर देखरेख करण्यासाठी जनरल अरुणकुमार वैद्य महानगरपालिका तरणतलाव, चेंबूर च्या कार्यालयात तक्रार वही ठेवण्यात आलेली आहे. सदस्य व जनता ह्यांजकडून वेळोवेळी येणा-या तक्रारींची दखल घेण्यात येते आणि देण्यात येणा-या सुविधांमध्ये सुधारणा करण्यात येते. तसेच जनतेच्या तक्रारींची तीव्रता (गांभीर्य) लक्षात घेऊन लवकरात लवकर निकाली काढ़ण्याबाबत काळजी घेण्यात येते. तक्रारीचे स्वरुप लक्षात घेऊन आवश्यक असल्यास त्या संबंधित अधिका-यांकडे योग्य त्या कार्यवाही आणि निर्णयार्थ पाठविण्यात येतात.